## निशाणी ०५ खालील आदेश

१. वादीने सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ प्रमाणे दाखल केलेला असुन प्रतिवादीने दावा मिळकतीतुन हुसकावुन लावु नये तसेच हरकत व अडथळा करु नये म्हणुन तुर्तातुर्त मनाईची दाद मागितली आहे.

२. वादीचे प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे –:

मौजे तडसर, ता. कडेगाव येथील शेतमिळकत भूमापन क्र.३२५ क्षेत्र १ हे ७० आर पो.ख. ०.०७ आकार २ रु ५० पैसे हिस्सा ८ आणे यास ''दावा मिळकत अ'' असे संबोधले आहे. तर मौजे तडसर, ता. कडेगांव येथील ग्रामपंचायत मिळकत नं.८२५ मध्ये वर्णन केलेली उत्तरमुखी आर.सी. सी. इमारत लगत दगड विट सिमेंट बांधकाम एकपाखी लोखंडी ॲगल वरती पत्रा व खुली जागा यातील संपुर्ण हिस्सा यास ''दावा मिळकत ब'' असे संबोधले आहे.

वादी असे कथन करतात की, मूळ पुरुष प्रभू बाळा माळी यांची मौजे तडसर येथे रि.स.नं.८२/३ ही शेतजमिन होती व ते मयत झालेनंतर रि.स.नं.८२/३ चे रेकॉर्ड सदरी प्रभू यांचा थोरला मुलगा धोंडी यांची एकत्र कुटुंब मॅनेजर अशी नोंद झालेनंतर त्यांनी एकत्र कुटुंबाचे उत्पन्नातुन एकत्र कुटुंबाकरिता रि.स.नं.८२/४ ही शेतजमीन खरेदी घेतली. पुढे एकत्रीकरण योजना झालेनंतर रि.स.नं.८२/३ व ८२/४ या दोन्ही सर्व्हे नंबरचा मिळून भूमापन क्र.३२५ झाला व भुमापन क्र.३२५ चे ७/१२

रेकॉर्डसदरी धोंडी यांची एकत्र कुटुंब मॅनेजर अशी नोंद होती. प्रभू मयत झाले त्यावेळी त्यांना धोंडी, मारुती, पांडुरंग व शंकर अशी चार मुले वारस होती. सबब रेकॉर्ड सदरी दुरुस्ती करण्याच्या अनुषंगाने तसेच धोंडी आजारी असलेने त्यास पैशाची गरज असल्याने दिनांक ०२.०५.१९७९ रोजी भूमापन क्र.३२५ सदानंद व पांडूरंग, मारुती व शंकर यांचे नावे खरेदीपत्र करुन दिले. सदर खरेदीपत्रात धोंडीचे वाटपास येणारा हिस्सा पांडूरंग व वादी यांनी सदानंद यांचे नावे एकत्र कुटुंबाकरिता खरेदी घेतला आहे.

वादी पुढे असे कथन करतात की, वादी हे पांडूरंग प्रभू माळी यांचा मुलगा असुन वादीची आई विठाबाई हिच्याशी मयत पांडूरंग यांचा विवाह सन १९४३ रोजी झालेला होता. दावा अ मिळकत ही पांडुरंग यांची वडिलार्जित मालकी हक्क वहिवाटीची होती व आहे. दावा अ मिळकतीचे उत्पन्नातुन व वादीचे नोकरीचे उत्पन्नातुन दावा ब मिळकत ही एकत्र कुटुंबाकरिता पांडुरंग व वादी यांनी बांधलेली आहे.

वादी पुढे असे कथन करतात की, वादीचे वडिलांनी प्रतिवादी नं.२ हिचेशी बेकायदेशीर विवाह केलेला होता व त्यांचेबरोबर संसार करीत होते. वादी हा पांडूरंग यांचा मुलगा असलेने वादींनी गाव रेकॉर्ड सदरी व नोंदीसंबंधी व इतर हक्कासंबंधी वेळोवेळी महसुल खात्यामध्ये प्रतिज्ञापत्र, संमतीपत्र, वाटणीपत्र व त्याअनुषंगाने इतर लेख तयार करुन ठेवले होते. तथापि पांडूरंग हयात असल्यामुळे रेकॉर्ड सदरी वाटपाचे संबंधी अंमलबजावणी झाली नाही. वादीचे वडील पांडूरंग हे प्रतिवादी नं.१ ते ३ यांचे समवेत रहात असताना दिनांक ०९.११.२०१४ रोजी मयत झाले. सबब वडिलांच्या वारसा हक्काच्या फेरफार नं.५३१६ सदरी नोंदी करीत असताना प्रतिवादी नं.१ व २

यांनी दिनांक ३०.०७.१९९८ रोजी वादीचे वडिलांचे मानसिक अवस्थेचा व परिस्थितीचा गैरफायदा घेवुन वादीचे हक्क डावलणेकरिता बेकायदेशिरपणे मृत्यूपत्राचा दस्त घेतल्याचे दिसुन आले व त्याप्रमाणे तक्रार रजि.नं.६/२०१५ चे कामी मंडल अधिकारी, कडेगांव यांनी मृत्युपत्रासंबंधी प्रोबेट घेणेसंबंधी आदेश देवून वारसा हक्काची नोंद घेण्यास वादीस नकार दिला आहे. सदर निर्णयाविरुध्द् वादी यांनी मा. उपविभागीय अधिकारी, कडेगांव यांचेकडे अपिल दाखल केलेले असुन ते अद्याप प्रलंबीत आहे.

वादी पुढे असे कथन करतात की, दावा मिळकती या पांडूरंग यांचे एकत्र कुटुंबाच्या मालकीच्या असल्याने वादीचा दावा मिळकतीमध्ये हिंदु कायदयाप्रमाणे हक्क व अधिकार असुन तथाकथित मृत्युपत्र वादीचे हक्कावर बंधनकारक नाही. असे असताना सदर मृत्यूपत्राचे आधारे प्रतिवादी नं.१ ते ३ हे दावा मिळकतीमध्ये पांडूरंग व प्रतिवादी नं.१ चे नावे असणा-या दावा मिळकतीमधील वादी यांचा हक्क नाकारुन दावा मिळकतीचे वाटप वादी यांना करुन देण्यास दिनांक १९.०८.२०१५ पासुन नकार देवू लागले आहेत. सबब वादींचा दावा मिळकतीमधील असणारा १/३ हिस्सा अगर कायदयाने येणारा हिस्सा स्वतंत्रपणे व सरसनिरस मानाने वाटप होवुन मिळावा, तसेच प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी वादी यांचे दावा मिळकतीमधील समाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये अगर वादी यांना दावा अ व ब मिळकतीतून हुसकावून लावण्याचा प्रयत्न करु नये याबाबत तुर्तातुर्त ताकीद आदेश देणेकामी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**३.** प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी **निशाणी ३८** वर विस्तृतपणे कैफियत/ म्हणणे दाखल करुन वादीचे दावेतील व तुर्तातुर्त मनाई अर्जातील

कथने स्पष्टपणे नाकारलेली आहेत.

४. प्रतिवादी नं.१ ते ३ यांचे कैफियत/ म्हणणे मधील थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे -:

दावा कलम १ब मध्ये नमुद केलेली ग्रा.मि.नं.८२५ हे घर शेतजमिनीत बांधलेले असुन त्याचा मुळ रि.स.नं.१२१/२५अ असा असून ही मिळकत मुळ हरी नाना होवाळ (महार) यांची असुन त्यांचेकडुन मयत पांडुरंग यानी दिनांक २७.०४.१९७० रोजी वरील मिळकतीमधील १ आणा ६ पैचा हिस्सा रजिष्टर पत्राने खुष खरेदी केलेला होता आणि पांडुरंग यांनी सदर खरेदी केलेले क्षेत्र हे त्यांच्या पगाराच्या रकमेतुन खरेदी केले असलेने ती त्यांची स्वसंपादीत मिळकत होती. पांडुरंग माळी यांनी खरेदी केलेल्या क्षेत्रात त्यांच्या स्वत:च्या पैशाने ६ खण दुपाकी एकमजली कौलारु, पत्र्याचे घर त्यांचे स्वत:च्या पैशाने बांधलेले असुन त्यात त्यांनी स्वखर्चाने वीज कनेक्शन घेतले आहे. तसेच त्याठिकाणी बोअरवेल घेवुन त्यावर इले. मोटर बसवुन पिण्याच्या पाण्याची सोय केली आहे. म्हणजेच दावा कलम १ब ही मिळकत पांडुरंग माळी यांची स्वसंपादीत मिळकत असलेने सदर मिळकतीबाबत त्यांचे मृत्यूनंतर कोणताही वाद निर्माण होवु नये यासाठी पांडुरंग माळी यांची शारिरीक, मानसिक व बौध्दीक स्थिती चांगली असताना दिनांक ३०.०७.१९९८ रोजी त्यांचे स्वेच्छेने दोन साक्षीदारांसमक्ष दावा कलम १ब मध्ये नमुद केलेली ग्रा.मि.नं.८२५ ही मिळकत प्रतिवादी नं.१ यांना रजिष्टर मृत्यूपत्राने दिलेली आहे. सबब प्रतिवादी नं.१ हे दिनांक ०९.११.२०१४ पासुन दावा कलम १ब या मिळकतीचे रजिष्टर मृत्यूपत्राचे

आधारे मालक झालेले होते व आहेत. अशाप्रकारे ग्रा.मि.नं.८२५ ही मिळकत मयत पांडुरंग यांनी त्यांचे इच्छेने प्रतिवादी नं.१ यांना रजिष्टर मृत्यूपत्राने दिलेली असलेने पांडुरंग यांचे मृत्यूनंतर सदर मिळकतीत पांडुरंग यांची मालकी राहिलेली नसलेने ग्रा.मि.नं.८२५ ही मिळकत वादीला कायदयाने वाटून मागता येत नाही.

प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, जरी विठाबाई हिचे पांडुरंग यांचेबरोबर सन १९४३ मध्ये लग्न झालेले होते तरी विठाबाई हिने पांडुरंग यांचेबरोबर कधिही संसार केलेला नव्हता व नाही. सन १९६९ नंतर वादीने महसूल अधिका-यांना हाताशी धरुन खोटया रेकॉर्डच्या नोंदी तयार केलेल्या आहेत. वादीचे मुळ नाव विलास महादेव माळी, रा. इस्लामपूर असे असुन ते गॅझेट करुन दिनांक २५.०८.१९६९ रोजी विलास महादेव माळी या नावात बदल करुन विलास पांडुरंग माळी असे नविन नाव पांडुरंग माळी यांचे अपरोक्ष लावुन घेतले आहे. तथापि वादीचे संपुर्ण रेकॉर्ड हे विलास महादेव माळी या नावानेच आहे.

प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, वादीची मयत आई विठाबाई हिचे माहेर इस्लामपूर, ता. वाळवा असे असुन तिचे पांडुरंग यांचेबरोबर लग्न होणेपुर्वीच महादेव माळी, रा. इस्लामपूर यांचेशी अनैतिक संबंध होते असे प्रतिवादी नं.१ यांना मयत पांडुरंग यांनी सांगीतलेले होते. विठाबाई हिचे महादेव माळीशी अनैतिक संबंध असलेने तिने मयत पांडुरंग यांचेबरोबर कधीही संसार केला नाही, याउलट तिने महादेव माळी यांचेबरोबर पळुन जावून लग्न केले आहे आहे व सदर लग्नसंबंधातुन विठाबाई हिस वादीसह एकूण चार मुले व दोन मुली अशी अपत्ये झालेली

होती. त्यामुळे वादी व वादीचे इतर तीन भाऊ व दोन बहिणी यांना महादेव यांची मुले म्हणुनच ओळखले जात होते. वादीचे जन्मानंतरचे वडिलांचे नाव या कॉलममध्ये शाळेमध्ये, सरकारी दप्तरमध्ये तसेच नोकरीचे ठिकाणी व सर्व्हीस बुकमध्ये महादेव माळी असेच नोंद होते व आहे. त्यामुळे वादी हा पांडुरंगचा मुलगा असणेचा प्रश्नच निर्माण होत नाही. वादीचे कुठेही लग्न जमेना म्हणुन पांडुरंगच्या अपरोक्ष कांही खोटी कागदपत्रे तयार करुन त्या आधारे नावात बदल केला. सबब वादीने प्रस्तुतच्या खोटया दाव्याची उभारणी करुन या प्रतिवादींना शारिरीक, मानसिक व आर्थिक त्रास दिलेला असलेने वादीचा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजुर करणेबाबत विनंती केली आहे.

५. प्रतिवादींनी **निशाणी ४३** वर या दाव्याच्या अनुषंगाने वादीविरुध्द् प्रतीदावा दाखल करुन या प्रतिदाव्यातील वादींनी प्रतिदाव्यामधील मिळकतींचे वादी हे दिनांक ३०.०७.१९९८ रोजीचे मृत्यूपत्राचे आधारे मालक झालेले आहेत असे जाहीर होवुन मिळणेकरिता व निरंतर ताकिदीकरिता प्रस्तुतचा प्रतिदावा दाखल केल्याचे नमुद केले आहे.

६. प्रतिवादीचे प्रतीदाव्यास वादीने **निशाणी ५३** वर कैफियत व म्हणणे दाखल केलेले असुन त्यामध्ये प्रतिवादींचा प्रतीदावा नामंजुर करणेबाबत विनंती करीत आहेत.

७. वादीतर्फे त्याच्या कथनाच्या पृष्ठयर्थ बरीच कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत व त्या कागदपत्रांचा आधार घेतलेला आहे. वादीने **निशाणी ३** सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे हजर केली आहेत -:

१. तडसर येथील भूमापन क्र.३२५ चा ७/१२ चा मुळ उतारा (निशाणी ७),

२. ग्रा.मि.नं.८२५ चा नमुना नं.८ चा मुळ उतारा (निशाणी ८),

३. मुळ फेरफार नं.४७५८ (निशाणी ९),

४. तडसर येथील स.नं.८२/३ चा सन १९५२ ते १९६२ चा मुळ ७/१२ उतारा (निशाणी १०),

५. मुळ फेरफार नं.४८३४ (निशाणी ११),

६. तडसर येथील स.नं.८२/४ चा सन १९५२ ते १९६३ चा मुळ ७/१२ उतारा (निशाणी १२),

७. स.नं.८२/३ व ८२/४ चा (९)(३)(९)(४) चा एकत्रीकरणाचा मुळ उतारा (निशाणी १३),

८. तडसर येथील भूमापन क्र.३२५ चा सन १९७२ ते १९८६ चा मुळ ७/१२ उतारा (निशाणी १४),

९. दि.०२.०५.१९७९ रोजीचे खरेदीपत्राची सत्यप्रत,

१०. प्रतिवादी नं.२ चे वडील व वादीचे वडील पांडुरंग यांचा मुळ खातेउतारा (निशाणी १५),

११. प्रतिवादी नं.२ चा मुळ खातेउतारा (निशाणी १६),

१२. दि.२७.०४.१९७०, १५.०६.१९७० व २४.०६.२०१३ रोजीचे खरेदीपत्राच्या सत्यप्रती,

१३. दि.३०.०७.१९९८ रोजीचे मृत्यूपत्राची सत्यप्रत,

१४. पांडुरंग माळी व विठाबाई यांची प्रतिज्ञापत्रे,

१५. दि.२२.०९.२००५ रोजीचे मुळ वाटणीपत्र,

१६. दि.२६.११.२०१२ रोजीचे मुळ संमतीपत्र,

१७. वडिल मयत झालेबाबत दैनिक पुण्यनगरी वृत्तपत्रातील मुळ निधनवार्ता,

१८. तक्रार रजि.नं.६/१५ चे निकालपत्राची छायांकित प्रत,

तसेच वादीने **निशाणी १९** सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे हजर केली आहेत.

१. प्रतिवादी नं.१ ते ३ यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम ३ प्रमाणे पुर्तता केलेबाबत पोष्टाच्या मुळ पावत्या,

तसेच वादीने **निशाणी ५९** सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे हजर केली आहेत.

१. वादी यांचे लग्नाच्या फोटोची एक मुळ प्रत,

२. वादी यांचे कुटुंबाच्या फोटोच्या दोन मुळ प्रती,

३. वादी यांचे कुटुंबाचा मुळ फोटो,

४. वादीतर्फे साक्षीदार बबन पांडुरंग पवार, कृष्णत राजाराम पवार यांची शपथपत्रे,

५. दावा अ मिळकतीमध्ये वादी यांनी मारलेल्या बोअरच्या बिलाची मुळ पावती,

६. वादीचे व्हेरिफाईड केलेले रेशनकार्ड व बॅक पासबुक,

७. वादी यांचे नावे असणारे शेअर्सबाबत मुळ सभासद कार्ड,

८. वादी यांचे रहिवाशी दाखल्याची छायांकित प्रत,

९. हिंदु लॉ पुस्तकामधील छायांकित प्रत,

तसेच वादीने **निशाणी ७२** सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे हजर केली आहेत.

१. वादी यांचा ग्रामसेवक यांनी दिलेला मुळ रहिवाशी दाखला,

२. वादी यांचा गावकामगार तलाठी यांनी दिलेला मुळ रहिवाशी दाखला,

३. वादींना वादीचे वडील पांडुरंग माळी यांनी दि.१६.११.१९९५ व ०८.०४.१९९६ रोजी पाठविलेली मुळ पत्रे,

४. वादींना प्रतिवादी नं.१ ने दि.३०.०४.१९९६, १२.०६.१९९६, ०६.०३.१९९६, ०२.०७.१९९६ रोजी पाठविलेली पत्रे,

५. लाईल बिलाची छायांकित प्रत,

तसेच वादीने **निशाणी ७९** सोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे हजर केली आहेत.

१. गट नं.३२५ मधील वादी यांनी भरलेली एकुण चार मुळ लाईट बिले,

२. वादी यांनी करुन घेतलेल्या महाराष्ट्र शासन राजपत्राची छायांकित प्रत,

३. दिनांक २१.०१.१९८० रोजीचे खरेदीपत्राची छायांकित प्रत,

८. प्रतिवादी यांनी त्यांचे कथनापृष्ठयर्थ **निशाणी ७५** सोबत खालील कागदपत्र हजर केलेली असुन त्यांचा आधार घेतलेला आहे.

१. ऊरुण इस्लामपुर, ता. वाळवा येथील सन २०१६ चे मतदार यादीची सत्यप्रत,

२. दि.१५.०९.१९४७ रोजीचे दैनिक समर्थ मधील जाहीर नोटीसीच्या उत्तराची छायांकित प्रत,

३. इस्लामपुर नगरपरिषद येथील सन २००६ ते २०१० चे उता-यातील सि.स.नं.४२९ चा मुळ उतारा,

४. १६ ऑक्टोबर १९६९ वे गॅझेटची छायांकित प्रत,

५. दि.३१.०७.१९७८ रोजीच्या स्टेटमेंट ऑफ फिक्शेसनची छायांकित प्रत,

तसेच प्रतिवादीतर्फे साक्षीदार प्रभाकर कुलकर्णी यांनी **निशाणी ७०** सोबत खालील कागदपत्रे हजर केलेली असुन त्यांचा आधार घेतलेला आहे.

१. विलास महादेव माळी उर्फ विलास पांडुरंग माळी यांचे सर्व्हिस बुकाचे पहिले पानाच्या छायांकित प्रतीची सत्यप्रत.

**९.** वादी-प्रतिवादी यांची दावा, मनाई अर्ज कैफियतमधील कथने व दोन्ही बाजुंचे विधिज्ञांचा युक्तीवाद विचारात घेता, माझेसमक्ष पुढील मुद्दे उपस्थित होत आहेत. त्याचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्रं. | मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी प्रथमदर्शनी त्याची केस शाबीत करतो का ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीचे बाजुने आहे का ? | होकारार्थी |
| ३. | सदरचा अर्ज नामंजुर झालेस वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे का ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा कमांक १ करिता –</u>**

**१०.** वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला असुन वादी व प्रतिवादी नं.१ व २ हे मयत ''पांडुरंग'' चे सरळ वारस असलेबाबत कथन केलेले आहे. तथापि प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी वादी हे मयत ''पांडुरंग'' यांचे सरळ वारस असलेच्य विधानास आक्षेप घेवुन दावा मिळकतीशी वादीचा काहीही संबंध नसलेचे कथन केलेले आहे. वरील दोन्ही बाजुंची कथने विचारात घेता मुद्दा क्र.१ चे अनुषंगाने वादीने प्रथमदर्शनी तो मयत ''पांडुरंग'' यांचा मुलगा असलेचे या न्यायालयाचे निदर्शनास आणुन देणे क्रमप्राप्त आहे.

**११.** वादीच्या मते सन १९४७ साली वादीची आई कौटुंबिक कारणास्तव मौजे आरळे येथे रहात असताना वादीचा जन्म झालेला आहे.

वादी हा पांडुरंग यांचा मुलगा असलेने वादींनी गाव रेकॉर्ड सदरी व नोंदीसंबंधी व इतर हक्कासंबंधी वेळोवेळी महसुल खात्यामध्ये प्रतिज्ञापत्र, संमतीपत्र, वाटणीपत्र व इतर लेखही तयार करुन ठेवलेले आहे. वादीने निशाणी ३ वरील अनुक्रमांक १६ वर मयत पांडुरंग यांनी दिनांक २२.०३.१९६९ रोजी करुन दिलेले प्रतिज्ञापत्र हजर केलेले असुन अनुक्रमांक १७ वर वादीची आई म्हणजेच मयत पांडुरंग यांची प्रथम पत्नी ''विठाबाई'' हिने दिनांक १७.०१.१९६९ रोजी करुन दिलेले प्रतिज्ञापत्र हजर केलेले आहे. वरील दोन्ही प्रतिज्ञापत्र हे तालुका दंडाधिकारी, कोल्हापुर यांचेसमक्ष नोंदविलेली दिसुन येत आहेत. या दोन्ही प्रतिज्ञापत्रातील मजकुराचे वाचन करता ''मयत पांडुरंग'' यांनी व ''विठाबाई'' यांनी वादी हा मयत ''पांडुरंग'' यांचेकडुन विठाबाईस झालेला मुलगा असलेचा उल्लेख दिसुन येतो.

**१२.** तथापि प्रतिवादी नं.१ ते ३ च्या मते वादी हा विठाबाई व महादेव माळी यांचा मुलगा आहे. ''पांडुरंग'' व विठाबाई यांचा विवाह झाल्यानंतर काही दिवसांत ती ''महादेव माळी'' याच्याबरोबर पळुन गेली. विठाबाई हिने महादेव माळी याचेबरोबर विवाह केला व त्यास वादी व अन्य चार भाऊ व दोन बहिणी अशी अपत्ये झालेली आहेत. वादीचे जन्मानंतरचे वडिलांचे नाव या कॉलममध्ये, शाळेमध्ये तसेच सरकारी दफतरामध्ये, नोकरीचे ठिकाणी, सर्व्हिस बुकमध्ये महादेव माळी असेच नोंद होते. प्रतिवादीने **निशाणी** ६४ वर अर्ज देवुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हातकणंगले यांस वादीचे सर्व्हिस बुकाची छायांकित प्रत हजर करणेबाबत साक्षीसमन्स काढलेले होते. प्रस्तुत साक्षीदाराने वादीचे सर्व्हिस

बुकाची छायांकित प्रत निशाणी ७० वरील कागद यादीसोबत हजर केलेली आहे. या सर्व्हिस बुकाचे अवलोकन केले असता सन १९६८ मध्ये वादीचे नावाची नोंद विलास महादेव माळी अशी झालेली होती. तथापि महाराष्ट्र शासन राजपत्र ऑक्टोबर १६, १९६९ नुसार विलास महादेव माळी हे नाव रद्द होवुन त्याठिकाणी विलास पांडुरंग माळी असे नमुद झालेले दिसुन येते.

**१३.** वादीने निशाणी ७९ सोबत अनुक्रम नं.५ वर वादी यांनी करुन घेतलेल्या महाराष्ट्र शासन राजपत्र ऑक्टोबर १६, १९६९ ची छायांकित प्रत हजर केलेली असुन त्याचे अवलोकन केले असता, वादीचे नावाची विलास पांडुरंग माळी अशी नोंद झाली असलेचे दिसुन येते. पांडुरंग माळी हे दिनांक ०९.११.२०१४ रोजी मयत झालेले आहेत याबाबत दोन्ही पक्षांमध्ये वाद नाही. तथापि सन १९६९ साली झाले महाराष्ट्र शासनाचे राजपत्रास मयत ''पांडुरंग'' यांनी कोणताही आक्षेप नोंदविला नसलेचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**१४.** प्रतिवादीने वादीची आई ''विठाबाई'' काही महिनेच ''पांडुरंग'' यांचेबरोबर नांदली व लगेचच महादेव माही यांचेकडे निघुन गेली. त्यानंतर मयत पांडुरंग यांनी विठाबाईस रितीरिवाजानुसार घटस्फोट दिलेला आहे व त्यानंतर विठाबाई व महादेव माळी यास वादी हा मुलगा झाला असलेचे दर्शविणेबाबत मयत पांडुरंग याने दिनांक १०.०९.१९४७ रोजी जाहीर नोटीस दिलेचे कथन केले आहे. प्रतिवादीने या जाहीर नोटीसीची छायांकित प्रत हजर केलेली असुन त्याचे वाचन करता मयत पांडुरंग याने सदर नोटीस ही विठाबाई ही दिनांक १५.०४.१९४७ रोजीचे कोल्हापुर साप्ताहिकातुन दिले जाहीर नोटीसीचे अनुषंगाने उत्तर म्हणुन पाठविले असलेचे स्पष्ट होते.

मयत पांडुरंग यांनी "विठाबाई हिने दिले नोटीसीमधील मजकुर नाकारलेला असुन तिला नांदावयास येणेस कळविले असुन, नाही आलेस सदर नोटीस काडीमोड असलेचे संबोधले आहे''. प्रस्तुत प्रकरणी विठाबाई हिने मयत पांडुरंग यांस पाठविलेली नोटीस दोन्ही पक्षातर्फे हजर करणेत आलेली नाही. सबब पांडुरंग यांनी पाठविलेल्या या नोटीसीवरुन पांडुरंग यांनी विठाबाई हिचे मजकुरातील कोणत्या गोष्टी नाकारल्या हे स्पष्ट होत नाही.

**१५.** प्रतिवादीने निशाणी ७५ सोबत अनुक्रम नं. ५ वर स्टेटमेंट ऑफ फिक्सेशन याची छायांकित प्रत हजर केलेली आहे. यामध्ये वादीचे नावाची नोंद विलास महादेव माळी असलेचे दिसुन येते. तथापि मयत पांडुरंग याने वादीस करुन दिलेले दिनांक २२.०३.१९६९ मधील प्रतिज्ञापत्राचे वाचन केले असता त्यामध्ये मयत पांडुरंग यांनी विलास याचे नाव विठाबाईने विलास महादेव माळी लावले असलेचे व विलास हा पांडुरंगचाच मुलगा असल्याचे कथन केलेले आहे. तसेच शासकिय राजपत्राआधारे वादीचे नावात झालेल्या बदलाबाबतही मयत पांडुरंग यांनी सन १९६९ ते २०१४ पर्यंत आक्षेप नोंदविला नसलेने वादी हा "मयत पांडुरंग'' यांचा मुलगा नसल्याचे प्रतिवादी नं.१ ते ३ यांचे कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य दिसुन येत नाही.

**१६.** वादीचे मते दावा मिळकत 'अ' ही मयत पांडुरंग व वादी यांनी मिळुन प्रतिवादी नं.१ चे नांवे धोंडी यांचेकडुन एकत्र कुटुंबाकरिता खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीपैकी धोंडी याचे वाटणीचा असणारा २ आणे १० पै चा हिस्सा पांडुरंग यांनी दावा 'अ' मिळकतीचे उत्पन्नातुन व वादी यांनी त्यांचे नोकरीच्या उत्पन्नातुन सदानंद यांचे एकत्र कुटुंबाकरिता घ ेतलेला होता. तसेच दावा मिळकत १ब ही दावा मिळकत १अ चे उत्पन्नातुन

व वादीचे नोकरीचे उत्पादनातुन दावा मिळकत 'ब' ही एकत्र कुटुंबाकरिता पांडुरंग व वादी यांनी बांधलेली आहे. प्रतिवादीचे मते दावा मिळकत १अ व १ब ही पांडुरंग यांची स्वकष्टार्जित होती. त्यांनी दिनांक ३०.०७.१९९८ रोजीचे मृत्युपत्राने दावा मिळकत १अ ही प्रतिवादी नं.३ यास व दावा मिळकत १ब ही प्रतिवादी नं.१ यास दिलेली आहे. प्रतिवादीने सदर मृत्युपत्राचा दस्त याकामी हजर केलेला आहे.

**१७.** वादीने दावा मिळकत १अ संदर्भात हजर केले खरेदीपत्राचे अवलोकन केले असता गट नं.३२५ या मिळकतीमधील २ आणे १० पै हिस्सा धोंडी यांनी प्रतिवादी नं.१ यास खरेदी दिलेला दिसुन येतो व ५ आणे २ पै चा हिस्सा पांडुरंग यास खरेदी दिलेला दिसुन येतो. तथापि वादीचे कथनानुसार सदरची मिळकत मुळ पुरुष प्रभू यास धोंडीशिवाय अन्य तिघे मुले होती. त्यापैकि पांडुरंग हे ही होते. त्यामुळे धोंडीचे नावे असणारे एकत्र कुटुंब प्रमुख नोंद कमी करणेसाठी रेकॉर्ड दुरुस्त करणेसाठी सदानंद मारुती, पांडुरंग व शंकर यांचे नावे खरेदी करणेत आली. याउलट प्रतिवादीचे कथन असे आहे कि, रि.स.नं.८२/४ ही मिळकत धोंडी यांची स्वकष्टार्जित अशी आहे. ती प्रतिवादी नं.१ यांनी व पांडुरंग यांनी मोबदला देवुन खरेदी घेतलेली आहे. त्यामुळे प्रतिवादीचे मते गट नं.३२५ तसेच ग्रा.मि.नं. ही मिळकत स्वकष्टार्जित अशी आहे. त्यामुळे ती ३०.०७.१९९८ रोजीचे पांडुरंग यांनी करुन दिले मृत्युपत्राने प्रतिवादी नं.१ व ३ यांचे मालकीची आहे.

**१८.** वादीने दावा मिळकत १अ व १ब ही वडिलार्जित असलेचे दाखविणेकरिता मयत पांडुरंग यांनी दिनांक २२.०९.२००५ रोजी करुन ठेवलेले वाटणीपत्र, तसेच दिनांक २६.११.२०१२ रोजी करुन दिलेले

संमतीपत्राचा आधार घेतलेला आहे.

१९. वादी-प्रतिवादी यांनी परस्पर मजकुर असणारे कागदपत्रके अभिलेखावर हजर केली असलेने दावा मिळकत १अ व १ब ही वडिलार्जित आहे किंवा कसे हे या दाव्याचे चौकशीअंती सिध्द् होणार आहे. सबब याबाबत यास्थितीत कोणताही उहापोह करणे न्यायोचित वाटत नाही.

२०. वादीचे मते दावा मिळकत १अ व १ब मध्ये वादीचा समाईक कब्जा असुन त्याप्रमाणे कब्जेवहिवाट आहे. तसेच वादीने दावा दाखल करतेवेळेस दावा मिळकत १अ मध्ये भुईमुग पिक घेतले होते. वादीने दावा मिळकत १अ मध्ये कब्जा असलेचे दाखविणेकरिता निशाणी ७९ सोबत अनुक्रम नं.१ ते ४ वर मयत पांडुरंग यांचे नावे असणारे तडसर येथील दिनांक ०१.०९.२०१५, १४.०६.२०१६, १५.११.२०१६ व ०८.०२.२०१७ रोजीचे वीज बील भरलेल्या मुळ पावत्या हजर केलेल्या आहेत. तसेच वादीने निशाणी ५९ सोबत अनुक्रम नं.६ वर गट नं.३२५ मध्ये मारलेल्या बोअर बीलची पावती हजर केलेली असुन ते ही वादीचेच नावे दिसुन येते. वादीने अनुक्रम नं.४ ते ६ वर तडसर येथील साक्षीदारांचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असुन त्यामध्ये दावा मिळकत १अ व १ब मध्ये वादीची समाईक कब्जेवहिवाट आहे असे नमुद केलेले दिसुन येते.

२१. वादीने निशाणी ७२ वरील कागद यादीसोबत अनुक्रम नं.३ ते ५ वर मयत पांडुरंग यांनी वादीस पाठविलेली मुळ पत्रे हजर केलेली आहेत. त्याचे वाचन करता, मयत पांडुरंग हे स्वत: हयात असताना वादीस शेत कसणेकरिता व इतर शेतीच्या मदतीकरिता बोलावुन घेत असत हे स्पष्टपणे

दिसुन येते. तसेच अनुक्रम नं.६ ते १० वर वादीने प्रतिवादी नं.१ ने त्यास पाठविलेली पत्रे हजर केलेली आहेत. या पत्रांचे वाचन केले असता प्रतिवादी नं.१ ने वादी व त्याचे पत्नीस ''दादा-वहिनी'' असे आदराने संबोधुन चौकशी करीत असलेचे स्पष्ट होते. याबाबत प्रतिवादीने कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. यावरुन वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान कोणतेही संबंध नसलेचे प्रतिवादीचे कथनामध्ये प्रथमदर्शनी तथ्य नसलेचे दिसुन येते. दावा मिळकतीमध्ये वादीस हक्क आहे किंवा कसे हे पुराव्याअंती निश्चीत होणार आहे. तथापि अभिलेखावरील कागदपत्रांवरुन वादी हे ''पांडुरंग'' हयात असलेपासुन दावा मिळकतीमध्ये पिके काढणेस, घेणेस पांडुरंग यांचे सांगणेवरुन योगदान करत आलेचे तसेच दावा मिळकत 'अ' मध्ये आजतागायत वहिवाट करत असलेचे प्रथमदर्शनी दिसुन येते. काही क्षणांकरिता वादीस दावा मिळकतीमध्ये हक्क येत नाही असे गृहीत धरले तरी अशा परिस्थितीत कायदयातील तरतुदीनुसार प्रतिवादीस कायदेशिर मार्गाशिवाय वादीस कब्जाहीन करता येणार नाही.

२२. वादीने दावा मिळकत 'ब' मध्ये त्याची समाईक कब्जेवहिवाट असलेचे कथन केलेले आहे. उलटपक्षी प्रतिवादीचे मते वादी हे कायमस्वरुपी इस्लामपुर येथे राहणेस आहेत. प्रतिवादीने आपले कथनापृष्ठयर्थ निशाणी ७५ वरील कागद यादीसोबत इस्लामपुर येथील मतदार यादीची प्रमाणित प्रत हजर केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता वादी व त्याचे कुटुंबियांचे मतदार म्हणुन नोंद इस्लामपुर येथे असलेचे स्पष्ट होते. प्रतिवादी यांनी निशाणी ७६ वर हजर केले असेसमेंट उता-याचे तसेच वादी यांनी निशाणी ७९ वरील कागद यादीसोबत हजर केले अनुक्रम नं.६ वरील खरेदीपत्राचे अवलोकन

केले असता वादीची पत्नी ''विमल'' हिचे नावे इस्लामपुर येथे घर मिळकत असलेचे दिसुन येते. तथापि वादीने हजर केले वादीचे शिधापत्रिका छायांकित प्रत, बॅक पासबुक, ग्रामसेवक मौजे तडसर तसेच गावकामगार तलाठी, मौजे तडसर यांनी दिलेला रहिवाशी दाखला याचे वाचन केले असता वादी हे तडसर गावचे रहिवाशी असलेचेही प्रथमदर्शनी दिसुन येते. तसेच ''मयत पांडुरंग'' यांनी पुर्वी पाठविले पत्रामध्ये वादी यास तडसर गावी त्यांचे घरी रहायला येण्यास सांगीतलेबाबतचा उल्लेख दिसुन येतो. वादीने हजर केले दिनांक २२.०९.२००५ रोजीचे मयत पांडुरंग यांनी करुन ठेवले वाटणीपत्राचे अवलोकन केले असता ग्रा.मि.नं.८२५ मधील उत्तर बाजुची आठ आणे हिश्श्याची मिळकत वादीस दिलेचे नमुद केले आहे. प्रस्तुत वाटणीपत्र हे अनोंदणीकृत असुन त्यावर वाटणीपत्र लिहुन ठेवणार म्हणुन ''पांडुरंग'' यांची सही असलेचा उल्लेख आहे. प्रस्तुत वाटणीपत्राची सत्यता ही पुराव्याअंती शाबीत होणार आहे. तथापि वादीने हजर केलेला उर्वरित कागदोपत्री पुरावा व साक्षीदारांचे प्रतिज्ञापत्र विचारात घेता वादी हा दावा मिळकत 'ब' मध्ये समाईक कब्जेवहिवाट करत असलेचे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**२३.** प्रतिवादीतर्फे वकिलांनी युक्तीवादादरम्यान कायदयाने सहहिस्सेदाराविरुध्द् तुर्तातुर्त मनाई आदेश करता येणार नाही असा मुद्दा उपस्थित केला. त्याकरिता प्रतिवादीने नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांचे "**Prakash S. Akotkar & Others V/s. Mansoorkha Gulbaksha & Others**, 1996(o) AIR Bom. 36" या न्यायनिर्णयाचा तसेच नामदार उच्च न्यायालय, पंजाब ॲण्ड हरियाणा यांचे **"Bal Kishan V/s. Ram**

**Kishan**” या न्यायनिर्णयाचा तसेच “**Bachan Singh V/s. Swaran Singh**” या न्यायनिर्णयाचा आधार घेतलेला आहे.

२४. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांनी **Prakash S. Akotkar & Others V/s. Mansoorkha Gulbaksha & Others (cited above)** या न्यायनिर्णयाचे कामी दिलेले निर्देश हे ‘‘जर एखादा सह-मालक त्यांचेकरिता व अन्य सहकालकांकरिता एखादया मिळकतीचा कब्जा धारण करत असेल तर अशा परिस्थितीमध्ये सह मालकाविरुध्द् मनाई आदेश करता येणार नाही’’ या परिस्थितीकरिता नमुद केलेले आहेत. तथापि प्रस्तुत प्रकरणांतील परिस्थिती ही यापेक्षा वेगळी असलेने प्रस्तुतचे निर्देश या प्रकरणांस लागु होत नाहीत.

२५. प्रतिवादीतर्फे हजर केलेले नामदार उच्च न्यायालय, पंजाब ॲण्ड हरियाणा यांचे **Bal Kishan V/s. Ram Kishan** या न्यायनिर्णयामध्ये **Bachan Singh V/s. Swaran Singh** मधील पारित केले निर्देशाचा संदर्भ नोंदविला असुन या दोन्ही न्यायनिर्णयांचे वाचन केले असता या न्यायनिर्णयामध्ये दिलेले निर्देश हे ‘‘ज्या सहमालकांकडे मिळकतीचा कब्जा नाही (a co-sharer out of possession)’’ यांचेकरिता पारित केलेले असुन या निर्देशानुसार कब्जात नसलेले सहमालकास अन्य सहमालकांविरुध्द् कब्जा उपभोगणेस मज्जाव करणेबाबत मनाई मागता येणार नाही. तथापि प्रस्तुत प्रकरणांत दावा मिळकतीमध्ये वादीची कब्जेवहिवाट असलेचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. अशा परिस्थितीमध्ये या न्यायनिर्णयामधील निर्देश याकामी लागु होणार नाहीत.

२६. याउलट वादीने निशाणी ५९ वरील कागद यादीसोबत अनुक्रम नं.११ वरील हजर हिंदु लॉ पुस्तकामधील छायांकित प्रतीचे वाचन केले असता व वादीची निशाणी ५ अर्जावरील विनंती विचारात घेता प्रतिवादीचे ''सहहिस्सेदाराविरुध्द् तुर्तातुर्त मनाई आदेश करता येणार नाहीत'' या कथनामध्ये तथ्य दिसुन येत नाही.

२७. वरील सर्व बाबी विचारात घेता वादीने सकृतदर्शनी त्याची केस असलेचे दाखवुन दिलेने मी मुद्दा क्रमांक १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविते.

**<u>मुद्दा क्रमांक २ व ३ करिता –</u>**

२८. वादीने दावा मिळकतीमध्ये त्याचे स्वत:ची कब्जेवहिवाट असलेचे प्रथमदर्शनी निदर्शनास आणलेले आहे. तसेच दावा मिळकतीमध्ये वादीसोबत प्रतिवादीचीही कब्जेवहिवाट असलेचे दिसुन येते. अशा परिस्थितीमध्ये वादीची तुर्तातुर्त ताकीद देणेची विनंती मान्य केलेस प्रतिवादीचे कब्जेवहिवाटीस असणारे क्षेत्रामध्ये त्यास वहिवाट करणेस कोणताही अडथळा होणार नाही तसेच प्रतिवादीचे कोणतेही हक्क संपुष्टात येणार नाहीत. याउलट अशी ताकीद न दिलेस वादी-प्रतिवादीचे बिघडलेले संबंध विचारात घेता, वादीस दावा मिळकतीमधुन हुसकावून लावले जाणेची शक्यता नाकारता येत नाही. तसेच प्रतिवादी यांनी प्रस्तुत दावेचे कामी वादीविरुध्द् प्रतिदावा केलेला आहे. प्रतिवादीस प्रतिदाव्याचे कामी यश प्राप्त झालेस त्यास वादीविरुध्द् अन्य दाद मागणेची कायदेशीर मुभा आहे. याउलट मनाई आदेश न झालेस वादींचेच अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब मी मुद्दा क्रमांक २ व ३ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविते.

**मुद्दा कमांक ४ करिता –:**

मुद्दा क्रमांक ४ चे निष्कर्षाकरिता मी पुढील आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. वादीचा तुर्तातुर्त मनाई अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत, दावा 'अ' व 'ब' मिळकतीमधील वादींचे समाईक कब्जेवहिवाटीस प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी स्वत: अगर अन्य इसमांमार्फत हरकत व अडथळा करु नये, दावा 'अ' मिळकतीमधील वादी यांचे पिकास उपद्रव होईल असे कोणतेही बेकायदेशिर कृत्य प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी स्वत: अगर अन्य इसमांमार्फत करु नये. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी स्वत: अगर अन्य इसमांमार्फत वादींना दावा मिळकतीमधुन हुसकावून लावु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश करणेत येत आहे.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

**सही /-**

**दिनांक १८.०५.२०१७.**

( श्रीमती. डी. बी. सुतार )
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कडेगांव.